**माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रकमेतून हाती घ्यावायच्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यता देण्याबाबत. नंदुरबार नगरपरिषद, जिल्हा नंदुरबार**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(२८)/तां.क.१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६

**वाचा:**

(१) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२४/प्र.क्र. ६६/ तां. क.१ दिनांक २७ सप्टेंबर, २०२४

(२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२१/प्र. क्र. ५७/ तां. क्र. १, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२

(३) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. मावअ ०८२५/ प्र. क्र. १५९(१४)/ तां. क्र. १, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५

(४) प्रशासकीय मान्यता देण्यासाठी गठीत समितीच्या दिनांक ०१ सप्टेंबर,२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

(५) मुख्यधिकारी, नंदुरबार नगरपरिषद यांचे पत्र जा. क्र. नंनप/आस्था/पा. पु/२७६८ दिनांक २३ जून, २०२६

**प्रस्तावना :**

माझी वसुंधरा अभियान ४.० मधील १२ गटातील विजेत्या स्थानिक स्वराज्य संस्थांना रोख रकमांची पारितोषिके व सदर बक्षीस रकमेच्या विनियोगाची कार्यपध्दती संदर्भीय क्रमांक (१) येथील दिनांक ०५ जून, २०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आली आहे. त्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांनी पारितोषिकाच्या रकमेमधून हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून, त्यास संदर्भीय क्रमांक (२) येथील दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीकडून प्रशासकीय मान्यता घ्यावयाची आहे.

२. माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत नंदुरबार नगरपरिषदेला प्राप्त होणाऱ्या रु. १.५० कोटी बक्षीस रकमेतून हाती घ्यावायच्या कामाचा रू. १,५१,३२,३२६.०० किमतीच्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुख्यधिकारी, नंदुरबार नगरपरिषद यांनी शहर अभियंता, मालेगाव महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेऊन सादर केला होता. सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल संदर्भिय क्र. (३) दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. प्रशासकीय मान्यतेनंतर सदर काम सुरू करण्यापूर्वी नंदुरबार नगरपरिषदेने, मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालामधील कामांच्या जागेमध्ये बदल करण्यासाठी मागणी केली आहे. प्रस्तावित "मियवाकी पद्धतीने वृक्षारोपण- हजरत पीर तलाव" या जागेत बदल करून "शहरातील नवीन रस्त्याच्या दुतर्फा आणि दुभाजकात वृक्षारोपण करणे" असा सुधारित प्रस्ताव मुख्यधिकारी, नंदुरबार नगरपरिषद यांनी दिनांक २३ जून, २०२६ पत्रान्वये केला. प्रशासकीय मान्यता देण्यासाठी मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली

दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालावर चर्चा होवून समितीने शिफारशी केल्या आहेत. समितीने केलेल्या शिफारशीनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत नंदुरबार नगरपरिषदेला प्राप्त झालेल्या बक्षीस रकमेमधून हाती घ्यावयाच्या कामांचा रु. ४२,८६,९३४.०० (रुपये बेचाळीस लक्ष शहाऐंशी हजार नऊशे चौतीस फक्त) किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुख्यधिकारी, नंदुरबार नगरपरिषद यांनी शहर अभियंता, मालेगाव महानगरपालिका, यांची तांत्रिक मान्यता घेवून सादर केला आहे. नंदुरबार नगरपरिषदेने सादर केलेला सदर प्रस्ताव मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत विचारात घेण्यात आला. सदर समितीने केलेल्या शिफारसीनुसार, नंदुरबार नगरपरिषदेने सादर केलेल्या सुधारित प्रस्तावानुसार संदर्भिय क्र. (३) येथील दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली सोबतच्या **जोडपत्र-१** मध्ये दर्शविण्यात आलेली कामे रद्द करण्यास व रु. ४२,८६,९३४.०० (रुपये बेचाळीस लक्ष शहाऐंशी हजार नऊशे चौतीस फक्त) रकमेच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांना खालील अटी व शर्तीच्या अधिन शासन प्रशासकीय मान्यता देत आहे. **प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत असलेली कामे सोबतच्या जोडपत्र-२ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.**

**२. अटी व शर्ती:**

१) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **नंदुरबार नगरपरिषद** राहील.

२) सदर सविस्तर प्रकल्प अहवालात नमूद केलेल्या कामांच्या अंमलबजावणीचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माझी वसुंधरा अभियान संचालनालयास पाठविण्यात यावा.

३) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांची अंमलबजावणी प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून पुढील ६ महिन्यात पूर्ण करावी.

४) बक्षीस रकमेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास तो स्वनिधी मधून करण्यात यावा.

५) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील मूळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास, त्यासाठी कोणताही वाढीव निधी / अनुदान उपलब्ध करून दिले जाणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६१०१६१३३२७३१०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHAHEEN SWALI SHAIKH

Digitally signed by SHAHEEN SWALI SHAIKH
Date: 2026.10.16 14:44:55 +05'30'

**(शाहीन शेख)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण अल्पसंख्याक विकास आणि औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
४) मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
५) मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
८) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग
९) जिल्हाधिकारी, नंदुरबार
१०)मुख्यधिकारी, नंदुरबार नगरपरिषद
११) निवडनस्ती तां.क.१

***जोडपत्र- १***

शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(२८)/तां. क.१
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६

(शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२४/प्र.क्र. ०४(२०)/ तां. क.१ दिनांक २३ मे, २०२५ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या कामांपैकी **खालील कामे रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**)

| **अ.क्र.** | **कामांचे नाव** | **मंजूर रक्कम (Rs.)** |
|---|---|---|
| 1 | Proposed Miyawaki Garden plantation and maintenance near Hazari peer talav | 41,46,134.00 |

***<u>जोडपत्र- २</u>***

शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक: **मावअ २०२६/प्र.क्र.२८९(२८)/तां.क..**
दिनांक:१६ ऑक्टोबर,२०२६ चे सहपत्र

| अ.क्र. | सुधारित कामांचे नाव | सुधारित अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | Proposed tree plantation in various dividers of Nandurbar Municipal council, Nandurbar | 42,86,934.00 |
| | **Total** | 42,86,934.00 |